ISSN 245[illegible]-[illegible]292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VI, Issue - XI, Vol.- II Impact Factor 6.10 (GRIFI) Sept. 2019 To Feb. 2020

SHIVRAJ COLLEGE OF ARTS, COM. & D.S. KADAM SCIENCE COLLEGE
K.V.R.S.S.S. GADHINGLAJ

EDITOR IN CHIEF
Prof. Dnyanraja Chighalikar

IAP
INDO ASIAN PUBLICATION

IMPACT FACTOR 6.10
ISSN 2454-3292
Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XI, Vol. : II
Sept. 2019 To Feb. 2020
www.irasg.com

**Research Paper** 20 **Marathi**

# 'मंथन वडारी बोलीचे

**अनिल लक्ष्मण कलकुटकी**
संशोधक विद्यार्थी,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

बोली ही संस्कार आणि अनुभवाची शिदोरी आहे. या बोलीतून आपल्या भाव–भावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. हे बोलीचे माध्यम घेऊन समाजाला आपलेपण देणारी आणि समाजात मौखिक परंपरेतून रूजणारी बोली ही त्या–त्या समाजाचे, समूहाचे किंवा भौगोलिक परिसराचे अथवा विशिष्ठ अशा भुप्रदेशाचे प्रतिनिधत्व करणारी आहे. पुढे ही बोली सांस्कश्तिक, सामाजिक, व्यवसाय अथवा अन्य क्षेत्रात किंवा गोपनीयता जपण्याच्या उद्देशाने प्रभावी ठरू लागल्याने त्या बोलीला महत्व प्राप्त होऊ लागले. तिचे जतन करण्याची गरज निर्माण झाली आहे. या बोलीमुळे विशिष्ठ अशी संस्कारमूल्ये टिकविण्याचा प्रयत्न होऊ लागला आहे. बोलीला जीवंतपणा आणण्याचा प्रयत्न आपण रोजच्या व्यवहारातून करणे गरजेचे आहे. तसेच ती बोली समाजमान्य होण्यासाठी सर्वांनी अधिक प्रयत्न केले तरच आपल्या भारतीय बोलीचे पावित्र्य अधिक आपलेपणाने जपले जाईल. ही आपल्या समाजातील बोलीविषयी आदरभाव व्यक्त करणारी भावना आहे.

मराठी भाषा जगात दहावी तर भारतात तिसरी भाषा आहे. महाराष्ट्रात या विविध लोकबोली म्हणून रूढ झाल्या आहेत. या बोलीतून समाजभाव, व्यक्तीभाव, व्यक्त होत असतो बोलीभाषा हे संवादाचे मुख्य माध्यम बनले आहे. बोलीभाषेतून साधलेला 'संवाद' हा आपल्या मनाचा कप्पा 'रिता' करणारा आहे. याचे प्रत्यंतर बोलीतून आपणा सर्वांना येत असते. बोली ही समाजमान्य झाली आहे. एकमेकांना कळणारी, जोडणारी, शब्दांनी आणि अर्थांनी वळणारी, लकबीत ओढीव आणि घडीव अशी तसेच गोडी आणि माधुर्य ठसठसून भरलेली भावसौंदर्य उलगडणारी 'बोली' ही भाषेचे 'बावनकशी' सोनं म्हणावे लागेल. हे सोनं मराठी मातीत घडलं, माणसांच्या मनाशी भिडलं आणि सुसंवादाने अधिक लकाकले म्हणून बोलीचा 'दागिना' संस्काराने मढला आहे. तो परंपरेचा 'बाज' घेऊन आपलेपणाने मिरवत





आणि माणूस घडवत आहे याची 'साक्ष' या बोलीने भाषेला दिली आहे. म्हणूनच केवळ सुसंस्काराचा आणि वरवरचा टेंभा मिरविणाऱ्या सुशिक्षितपणाचा आव आणणाऱ्या तसेच गावंडळ भाषा म्हणून हिणवणाऱ्या प्रवृत्तीला 'आपली बोली, आपला बाणा' हा सामाजिकतेच्या पातळीवर सक्षम असा पर्याय आहे. याचा आत्मविश्वास बोलीभाषेतून व्यक्त होणाऱ्या प्रत्येकांना आहे. म्हणूनच ही 'आपली बोली आपला बाणा' हे प्रत्येकांच्या जगण्याचा भाग बनला आहे. या समाजनिहाय, व्यक्तीसमूह निहाय, प्रांतिक, भु–भागनिहाय तसेच जाती–जमातीनिहाय स्वतंत्र अशी वेगळी बोली आहे. ती ज्यांची–त्यांची वेगळी अशी ओळख निर्माण करणारी आहे.

आज वाढत्या इंग्रजीमुळे गावो–गावींच्या शाळा इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी गिळंकृत करण्याचा हा प्रकार होत आहे. त्यामुळे गावच्या मराठी शाळेची दुरावस्था होत आहे. मग अशा गावो–गांवीच्या मराठी शाळा वाचविण्यासाठी शिक्षक व शाळा व्यवस्थापनचे पदाधिकारी धडपडत आहेत. हे विदारक चित्र गावो–गांवी पाहावयास मिळत असल्याने आपली नेमकी वाटचाल मातृभाषेला तारणारी आहे की मारक ठरणारी आहे? याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली असताना अशा इंग्रजी शिक्षणाच्या पगड्यात आपली 'मराठी' श्वास मोजत असल्याची खंत व्यक्त करण्यापेक्षा आपल्या भाषेचा सन्मान वाढविण्याबरोबर बोली आणि भाषेचा लौकीक वाढविण्यासाठी बोली भाषेचे जतन आणि संवर्धन करण्याची आता खरी वेळ आपणा सर्वांवरून येऊन ठेवली आहे.

ज्या–त्या भागात प्रांतात भु–भागात स्वतःची त्या भागाची किंबहुना त्या–त्या परिसराची बोलीभाषा म्हणून असतेच असते. ती बोली त्या त्या भागाची ओळख बनलेली असते. आपुलकी, गोडी, भाव, शिवाय परंपरा, रूढींचा किंबहुना तेथील संस्कश्तीचा त्या–त्या भागातील भौगोलिक परिसराचाही प्रभाव त्या बोलीभाषेवर दिसून येतो. आपल्या बोलीभाषेला आपलेपण प्राप्त व्हावे ही उदात्तता आता जपणे आवश्यक आहे. शिवाय या बोलीभाषेचा स्विकार आपण पूर्णतः करणे काळाची गरज आहे. जुन्या मुल्यावर्धित संस्काराची रूजवणूक करणारी आपली बोली ही आपल्या मनातल्या आनंदाला पल्लवीत करणारी आहे.

आज सर्वत्र इंग्रजाळलेल्या भाषेत आपली बोली आपल्यापासून दुरावते की काय अशी अवस्था निर्माण झाली आहे. या बोलीला आपलेपणा प्राप्त करून देण्यासाठी सामुहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. या बोलीला सामाजिकता प्राप्त करून देण्यासाठी या बोलीभाषेचे साहित्य संमेलन ज्या–त्या पातळीवर होणे आवश्यक आहे. ही बोली आपली आपल्याबरोबर समाजाची, भागाची, आपल्या प्रांताची व्हावी यासाठी अधिक तन्मयतेने बोलीभाषेचा जागर करण्यासाठी बोली भाषेची साहित्य संमेलन व्हावेत यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आपली स्वतंत्र अशी ओळख निर्माण करणारी बोली ग्रामीण भागात अजुनही घट्टपणे माणसाच्या मनाशी एकरूप होऊन मनामनांमध्ये विसावली आहे. संवादा–संवादामध्ये खुलली आहे. तिची 'दानत' कधीही न संपणारी आहे. पिढ्यांन–पिढ्या आपल्या संस्कश्तीचे जतन करणारी आपली बोली ही प्रत्येकाच्या काळजाच्या कुपीत अभिमान आणि स्वाभिमान



Principal
Shivraj College of Arts, Commerce,
& D.S.Kadam Science College,
Gadhinglaj.(Dist. Kolhapur)